गुप्त संदेश

रूमीच्या एका कवितेवर आधारित

लेखिका: मीना जाव्हार्बिन

चित्रे: ब्रूस वॉटली

एकाकी, सोन्याच्या पिंजऱ्यात कैद, जंगलातील घरापासून दूर एक पोपट स्वातंत्र्यासाठी आसुसला आहे. तो या कैदेतून कधी सुटू शकेल का?

रूमीच्या एका प्राचीन फारसी कवितेवर आधारित *गुप्त संदेश* या पुस्तकातून कमालीचे चातुर्य, दृढ एकजूट, परदेशी प्रवास आणि एक साधीशी इच्छापूर्ती यांचे दर्शन घडते.

गुप्त संदेश

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन

फार फार वर्षांपूर्वी, एका श्रीमंत फारसी व्यापाऱ्याने बाजारातील आपल्या दुकानात एक भारतीय पोपट पाळला होता. कधीतरी भारतीय जंगलांमध्ये स्वच्छंदीपणे उडणारा तो पक्षी आता एका छोट्याशा पिंजऱ्यात कैद होऊन राहिला होता.

दुकानाचे घुमटाकार छत आणि भिंती रंगीबेरंगी लाद्या लावून सजवले होते. पण पोपटाला जंगलाचे सौंदर्य, तेथील मुक्त जीवन यांची आठवण येत असे. दिवसभर पोपट जंगलाची स्मरणगीते गाई. पण व्यापारी त्याला पिंजऱ्यातून सोडत नव्हता, कारण तो पोपट मधुर आवाजात गात आणि बोलत असे. त्याचे चमकदार पंख बघून गिऱ्हाईक दुकानाकडे आकर्षित होत. तो व्यापारी श्रीमंत आणि प्रसिद्ध होण्यात पोपटाचा खूप हात होता.

एके दिवशी, काही श्रीमंत व्यापारी त्या दुकानाजवळून जात होता. त्यांचे झगमगीत कपडे पाहून पोपटाला जंगलातील ताऱ्यांची आठवण आली. त्याने त्या व्यापाऱ्यांना हाक दिली. पक्ष्याकडे आकर्षित होऊन सारे व्यापारी दुकानात शिरले. त्यांनी दुकानातून बऱ्याच वस्तू विकत घेतल्या. याचे बक्षीस म्हणून व्यापाऱ्याने पोपटाला एका सोनेरी पिंजऱ्यात ठेवले.



त्या रात्री व्यापाऱ्याने आपल्या कुटुंबियांना म्हटले, “मी आपल्या दुकानासाठी काही सामान विकत घ्यायला भारतात चाललोय.”

प्रत्येक कुटुंबियाला भारतातून काही ना काही खरेदी करायचे होते. आचाऱ्याने विविध मसाले आणायला सांगितले, व्यापाऱ्याच्या मुलींनी चमकदार रेशमी कपडे आणायला सांगितले आणि व्यापाऱ्याच्या पत्नीने सुंदर दागिने आणायला सांगितले. व्यापाऱ्याने सर्वांची इच्छा पूर्ण करायचे आश्वासन दिले.

प्रवासाला निघण्याआधी व्यापाऱ्याने पोपटाला विचारले की त्याला त्याची मातृभूमी भारतातून काय आणायचे? “एखादे परदेशी फूल वा चांदीचा पेला आणू?”

“मला काही नको,” पोपट उसासा टाकत म्हणाला. “पण जेव्हा तुम्ही जंगलातून जाल आणि माझ्यासारखे अनेक पोपट उडताना बघाल तेव्हा त्यांना सांगा की मी खूप दूर राहातोय. मला त्यांच्यासोबत मी उडायचो त्याची, त्यांच्या मधुर आवाजाची, तेथील झाडांच्या सुवासाची आठवण येते....”

व्यापारी त्याला मध्येच थांबवत म्हणाला, “पण पोपटा, तुला इथे काय त्रास आहे? तू तर छान सोनेरी झोक्यावर झुलत आरामात या आलिशान सोनेरी पिंजऱ्यात राहातोयस.”

“बरोबर बोलताय तुम्ही,” पोपट म्हणाला. “माझ्या मित्रांना या पिंजऱ्याबद्दलसुद्धा सांगा.”

“बरं,” व्यापारी म्हणाला.



सिल्क रोडवर व्यापाऱ्याच्या काफिल्याने शुष्क वाळुच्या टेकड्यांवरून, हिरव्यागार दऱ्यांमधून आणि पर्वतांवरील धोकादायक अरुंद पायवाटेने प्रवास केला. दीर्घ प्रवासानंतर, प्रवाशांनी सिंधू नदी ओलांडली.

गिलगिट शहरात, त्यांनी मंदिरातील नर्तकी, माकडे, हत्ती आणि गायी यांना नदी महोत्सवाची मौज लुटताना पाहिले. त्यांनी शांत मुद्रेत बसलेले योगी पाहिले तेव्हा त्यांना उमगले की ते भारतात पोहोचले होते.



व्यापाऱ्याने आधी आपल्या दुकानासाठी आवश्यक सामान खरेदी केले. मग त्याने पत्नीसाठी सुंदर अलंकार शोधले आणि आचाऱ्यासाठी सुगंधी मसाले खरेदी करून आणायला आपल्या गड्यांना बाजाराच्या कानाकोपऱ्यांत पाठवले. रेशमाच्या बाजारात व्यापारी गोंधळून गेला, कारण तिथे बहुरंगी कपड्यांचे ढीग होते. शेवटी, व्यापाऱ्याने आपल्या मुलींसाठी छोटी लाल फुले असलेले कापड निवडले.

पर्शियाला परतताना व्यापाऱ्याचा काफिला गर्द जंगलातून प्रवास करू लागला. तिथे त्याने आपल्या पोपटासारखे आवाज ऐकले, आपल्या पोपटासारखे सुंदर पोपट पाहिले. ते मुक्तपणे झाडांमधून उडत होते.

“थांबा सगळे,” व्यापाऱ्याने काफिला थांबवला. खाली उतरून त्याने त्या पोपटांना त्याच्याजवळ गोळा होण्यास सांगितले.

“माझ्याकडे तुमच्या मित्राचा एक संदेश आहे,” व्यापारी पोपटांना म्हणाला. पोपट वडाच्या झाडाच्या एका वाकलेल्या फांदीवर बसून व्यापाऱ्याचे म्हणणे ऐकू लागले.

“मी भारतापासून खूप दूर राहातो आणि माझ्याकडेसुद्धा एक पोपट आहे, अगदी तुमच्यासारखाच दिसणारा. त्याने तुमच्यासाठी एक संदेश पाठवलाय: त्याला जंगलातलं स्वच्छंदी उडणं, तुमचा मिठू मिठू आवाज आणि झाडांचा सुवास यांची खूप आठवण येतेय. मी त्याच्यासाठी एक सुंदर पिंजरा विकत आणलाय, त्यात तो राहातोय. पिंजऱ्यात तीन सोनेरी झोके आहेत.”

पोपटांनी त्याचे बोलणे नीट ऐकून घेतले. अचानक, ते एक एक करून फांदीवरून खाली पडू लागले. पाठ जमिनीला टेकलेली आणि पाय हवेत अशा स्थितीत ते खाली पडले. त्यांचे शरीर वडाच्या सावलीत निपचित पडून राहिले.

व्यापारी हैराण झाला. त्याचा या घटनेवर विश्वासच बसला नाही. पोपट जमिनीवर शांतपणे पडून राहिले होते. थोड्या वेळानंतर, व्यापाऱ्याने आपल्या काफिल्याला निघण्याचा आदेश दिला.

व्यापारी घरी परतला तेव्हा त्याच्या कुटुंबियांनी आणि मित्रांनी त्याच्यासाठी भारतीय मसाले वापरून चविष्ट भोजन बनवले आणि त्याचे जंगी स्वागत केले. संगीतकारांनी अंगणात तंबोरा आणि वीणा वादन केले. व्यापाऱ्याने आपल्या दीर्घ प्रवासाचा वृत्तांत ऐकवला. पण जंगलात पोपटांसोबत घडलेल्या घटनेचा त्याने उल्लेख केला नाही.



मग व्यापारी भारतातून आणलेला माल दुकानात लावण्यात दंग झाला. त्याने पोपटाशी बोलायचे टाळले.

एकदा दुपारी पोपटाने त्याला विचारले, “तुम्ही भारतात माझा संदेश पोहोचवलात का?”

“पोपटा, जंगलात जे काही घडले, त्याबद्दल मला काही बोलावसं वाटत नाही.”

पोपट म्हणाला, “मी या पिंजऱ्यात राहून वर्षानुवर्षे तुमच्यासाठी गाणी गातोय,” पोपट म्हणाला. “मी तुमच्याकडे दागिने, मसाले मागत नाही. मी फक्त माझा संदेश पोहोचवायला सांगितलं होतं. तुम्ही माझ्यासाठी एवढंसुद्ध करू शकत नाही?”



"ठीकाय, तुझा हट्टच असेल तर मी तुला सगळी घटना सांगतो. मी खरंच तुझा संदेश तिथल्या पोपटांपर्यंत पोहोचवला. त्यांनी तो ऐकला आणि अचानक ते सगळे झाडावरून खाली पडले. त्यांच्यापैकी कुणीही श्वास घेत नव्हते."

पोपटाने व्यापाऱ्याचे बोलणे ऐकले. अचानक पोपटाने आपले पाय आकाशाच्या दिशेने उचलले आणि तो आपल्या सोनेरी झोक्यावरून खाली पडला. तो श्वास न घेता निपचित पडून राहिला.

व्यापारी पिंजऱ्याकडे धावला. “हे काय केलं मी?” तो रडू लागला. “मी तुझ्या मृत्युचं कारण तर बनलो नाही ?”

पोपट पिंजऱ्यात शांत पडून होता. व्यापाऱ्याला वाटले की पोपट मेला. आता तो कुणा गिऱ्हाईकाला आपल्या दुकानात आकर्षित करू शकणार नाही. त्याने पोपटाला पिंजऱ्याच्या बाहेर काढून टेबलवर ठेवले.

क्षणभरातच, पोपटाने पंख फडफडवले आणि तो उडून दुकानाच्या छतावर जाऊन बसला.

“तू जिवंत आहेस!” व्यापारी आश्चर्याने म्हणाला.

“आधीपेक्षा खूप जास्त जिवंत आहे मी आता, मित्रा. माझा संदेश माझ्या मित्रांपर्यंत पोहोचवण्यासाठी आभार!”

मग पोपट घुमटाकार छताच्या भोकातून बाहेर उडाला, भारताच्या दिशेने, त्याच्या स्वच्छंदी दोस्तांना भेटायला.

लेखकाचे मनोगत

मी लहान होते तेव्हा इराणमध्ये वाढले. रोज संध्याकाळी मी बाबांकडे पोपट आणि व्यापाऱ्याची गोष्ट सांग, असा हट्ट धरत असे.

अनेक वर्षांनंतर, मी फारसी साहित्य अभ्यासले तेव्हा मला कळलं की माझी ही आवडती गोष्ट खरंतर एक प्राचीन कविता होती. कवी रूमीने ही कविता लिहिली होती. कवी रूमी प्रसिद्ध साहित्यिक होते आणि तेराव्या शतकात ते पर्शियात राहात होते.